सामना

# साहित्य मंचतून कथा-कवितांचा सुरेल प्रवाह

## शिवाजी महाविद्यालयात रंगला शब्दांचा उत्सव



परभणी, दि. १७ (प्रतिनिधी) - परभणी साहित्य अकादमी आणि श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'साहित्य मंच' उपक्रम झाला. मानवी नातेसंबंधांवर भाष्य करणाऱ्या कथा आणि हृदयस्पर्शी कवितांच्या माध्यमातून लेखक, कवींनी जीवनानुभव मांडले.

कार्यक्रमात बा.बा. कोटंबे आणि मिलिंद जाधव यांनी अनुक्रमे 'पडझड' आणि 'खुलासा' या कथांचे वाचन केले. कवी मोहन कुलकर्णी, केशव खटिंग आणि संतोष नारायणकर यांनी 'बंद खिडकीच्या आत', 'मॉडगेज', 'देव परीक्षा घेतात' यासह विविध कविता सादर केल्या. त्यांच्या ओळींना रसिकांकडून दाद मिळाली.

यावेळी प्राचार्य डॉ.बी.यू. जाधव, डॉ. आसाराम लोमटे, कवी केशव वसेकर, रेणू पाचपोर, सरोज देशपांडे, तुकाराम खिल्लारे, राजेंद्र गहाळ, प्रा. भगवान काळे, गंगाधर गायकवाड, माणिक पुरी, प्रा. जयंत बोबडे, प्रा. सखाराम कदम, सुरेश हिवाळे, शरद ठाकर, बालासाहेब जाधव, दत्ता चव्हाण, त्र्यंबक वडसकर, प्रा. प्रवीण पुरी, प्रा. मयूरी शिंदे, प्रा. सारिका पासंगे, प्रा. स्वाती देशमुख, मारोती डोईफोडे, माणिक रासवे, सुरेश पेदापल्ली, अरुण चव्हाण आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. आसाराम लोमटे, सूत्रसंचालन प्रा. बडुरे, आभार प्रा. प्रल्हाद भोपे यांनी मानले.

Marathwada Edition
Mar 19, 2025 Page No. 6
Powered by: erelego.com